| MHAH120012352022 | **म.सं.कौ.हिं.का. अर्ज क.७१/२०२२.** |
|---|---|
| | सौ.मनोहर रामगोपाळ यादव व इतर<br>**विरूध्द**<br>रामगोपाळ महादेव यादव व इतर. |

**निशाणी क. ६ वर आदेश**

(दिनांक १६ मार्च २०२३)

अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण करणे संबंधीचा कायदा २००५ कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी ठरवुन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. **अर्जदारांच्या अर्जातील कथन खालीलप्रमाणे आहे** —

अर्जदारांनी अर्जामध्ये नमुद केले आहे की, अर्जदार क. १ व सामनेवाला क.१ पती पत्नी असुन त्यांचा विवाह २६ वर्षापुर्वी मंडादनी, जि.शिखर, राज्य राजस्थान येथे झाला आहे. अर्जदार क.१ हिला सामनेवाला क.१ पासुन मुलगा नामे प्रदिप व मुलगी नामे सपना ही दोन अपत्ये आहेत. अर्जदार क.१ हिची परिस्थिती अत्यंत हलाखीची व गरीबीची आहे. तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही. तिच्याकडे खर्चासाठी पैशे नसल्यामुळे तिला ब—याच अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. अर्जदार क. १ व २ यांना औषधोपचार, दवाखाना, कपडेलत्ते व उदरनिर्वाह करीता खर्च होतो. सामनेवाले क.१ ते ४ यांनी अर्जदारांचा त्याग केल्यापासुन त्यांची कोणतीही काळजी घेतली नाही. सामनेवाले क. १ ते ४ यांनी

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Judgement
SMITA MANOHAR BANSOD
2023.03.16
17:58:47 +0530

अर्जदारांचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे.

**३.** अर्जदार क्र.१ व २ कडे उदरनिर्वाह करीता उत्पन्न नसल्यामुळे त्यांना अन्नवस्त्राची आवशकता आहे. सामनेवाले क्र.१ ते ४ यांचा येवला रोड, कोपरगांव येथे जयगुरूदेव या नावाने ग्रेनाईड व मारबल चा व्यवसाय असुन त्या व्यवसायापासुन त्यांना दरमहा ५ ते ७ लाख रूपये उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र.१ ची राजस्थान येथे स्थावर व जंगम मालमत्ता आहे. सामनेवाला क्र.१ वर अर्जदारा व्यतिरीक्त इतर कोणीही अवलंबुन नाही. अर्जदार क्र.१ व २ यांना सामनेवाला क्र.१ कडुन अन्नवस्त्राकरीता प्रत्येकी दरमहा १० हजार रूपये अंतरीम अन्नवस्त्र रक्कम देण्याचे आदेश करण्यात यावे. मुळ अर्ज चालविण्याकरीता व न्यायालयाचे कामकाजाकरीता अर्जदारांना सामनेवाला क्र.१ कडुन १० हजार देण्याचे आदेश देण्यात यावा.

**४.** सामनेवाले क्र.१ ते ३ यांनी मुख्य अर्जास व अंतरीम अर्जास **नि.क्र.१६** अन्वये उत्तर दाखल केले. सामनेवाले क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ पती पत्नी असुन त्यांचे लग्न २६ वर्षापुर्वी झालेले असल्याचे सांगितले. सामनेवाले यांनी अर्जदाराच्या अर्जातील इतर मजकुर नाकारले. अर्जदार क्र.१ सामनेवाला क्र.१ सोबत केवळ एक महिना व्यवस्थित नांदली. त्यानंतर ती त्याच्यासोबत शुल्लक कारणावरून वाद घालत होती. सामनेवाला क्र.१ घरातील कर्ता पुरूष असल्याने त्याच्यावर घरातील सर्व जबाबदारी होती. सन २००० मध्ये सामनेवाला क्र.१ कोपरगांव

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Judgement
SMITA MANOHAR BANSOD
2023.03.16
17:59:04 +0530

येथे मजुरीचे कामानिमित्त आला. सामनवोला क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिची बहिण मंजु हिचे कॅन्सरचे आजारावर बरीच रक्कम खर्च केली. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला सन २००२ मध्ये कोपरगांव येथे आणले. अर्जदार क्र.१ तिचे भाउ नामे प्रल्हाद व बाबुलाल यांचे ऐकुन वाद घालत होती. अर्जदार क्र.२ व मुलगा नामे प्रदिप यांचे शिक्षण संत ज्ञानेश्वर स्कुल, कोपरगांव येथे इयत्ता १ ते १० पर्यंत झाले आहे. अर्जदार क्र.२ ही सज्ञान असुन तिचे वय आज रोजी १८ वर्षे पुर्ण झाले आहे. एप्रिल २०२० मध्ये अर्जदार क्र.१ ही विनाकारण तिच्या माहेरी तिच्या मुलांसह निघुन गेली. सामनेवाला क्र.१ ने तिला आणण्याचा प्रयत्न केला असता तिने नकार दिला. दि.०१/११/२०२२ रोजी सामनेवाला क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिला नोटीस पाठवून नांदण्यास येण्याची विनंती केली. परंतु अर्जदार क्र.१ आली नाही. सामनेवाला क्र.१ यास डायेबटीज, संधीवात व मुळव्याध असे आजार आहेत. सामनेवाला इतरांवर अवलंबुन आहे. तो अर्जदारांना अन्नवस्त्र देण्यास असमर्थ आहे. तो अर्जदार क्र.१ हिला नांदण्यास आजही तयार आहे. सामनेवालाने अर्जदारांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. अर्जदार व सामनेवाला यांचे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात. त्यावर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले आहेत ते खालीलप्रमाणे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Judgement
SMITA MANOHAR BANSOD
2023.03.16 17:59:10 +0530

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ व २ यांनी मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **.....अंशत: होकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **.....अंतिम आदेशान्वये.** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**मुद्दा क्रमांक १ करीता :**

**६.** अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदार व सामनेवाले यांचे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच सामनेवाला याने देखिल अर्जातील कथनांचे खंडन करण्यासाठी त्याच्या जबाबासोबत शपथपत्र दाखल केले.

**७.** सामनेवालेने अर्जदारांसोबत नातेसंबंध कबुल केले आहे. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचे लग्न २६ वर्षापुर्वी झाले आहे. त्यांनी एकमेकांसोबत २६ वर्ष संसार केला. अर्जदार तिच्या मुलांसह सामनेवाला क्र.१ पासुन एप्रिल २०२० पासुन वेगळी राहत आहे. अर्जदार क्र. १ ही गृहिणी आहे. अर्जदार क्र.२ तिच्या सोबत राहत आहे. अर्जदार क्र. १ काहीही कामधंदा करीत नाही. तिच्यावर तिच्या स्वत:ची व अर्जदार क्र.२ च्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात सांगितले की, सामनेवालाने तिचा कौटूंबिक छळ केला. अर्जदाराने तिच्या अर्जात सामनेवाल्याने केलेल्या छळाबाबत नमुद केले आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Judgement
SMITA
MANOHAR
BANSOD
2023.03.16
17:59:15 +0530

८. अर्जदार क्र.१ ने मालमत्ते संदर्भामध्ये शपथ पत्र **नि.क्र.५** वर दाखल केले आहे. सामनेवाला क्र.१ ने मालमत्ते संदर्भामध्ये शपथपत्र **नि.क्र.१८** वर दाखल केले आहे. अर्जदाराने कथन केले की, सामनेवाला क्र. १ ते ४ यांचा येवला रोड कोपरगांव येथे जय गुरूदेव या नावाने ग्रेनाईड व मार्बलचा व्यवसाय असुन त्यापासुन ते दरमहा रूपये ५ ते ७ लाख उत्पन्न मिळवितात. सामनेवालाने तो मजुरी करतो असे कथन केले आहे. सामनेवालाने तो वयस्कर झाल्यामुळे त्याच्यापासुन कामधंदा होत नाही असे सांगितले. सामनेवाल्याने त्याच्या मालमत्ते संदर्भात शपथपत्रात नमुद केले की, तो मजुरीचे काम करतो. त्याने पुढे शपथ पत्रात असे कथन केले की, तो साईलक्ष्मी नगर येथे पत्र्याच्या शेडमध्ये राहतो. सामनेवाला क्र.१ नोकरीत नाही. अर्जदार क्र.१ हिच्या म्हणण्यानुसार सामनेवाला क्र.१ चा ग्रेनाईड व स्टाईल्सचा व्यवसाय आहे. अर्जदार हिने वर्णन **नि.क्र.२३** सोबत सामनेवाला क्र.१ चे व्हिजीटींग कार्ड दाखल केले आहे. सदर कार्ड जय गुरूदेव ग्रेनाईड व टाईल्सचे आहे. त्यावर प्रोप्ररायईटर म्हणुन सामनेवाला क्र.१ चे नाव लिहीले आहे. पुरावा नोंदविल्यानंतर सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्न व आर्थिक परिस्थिती न्यायालयासमक्ष येईल. अर्जदारांना त्यांच्या पालनपोषणाकरीता आर्थिक मदतीची गरज आहे. व्हिजीटींग कार्ड वरून सामनेवाला क्र.१ चे उत्पन्न सिध्द होत नाही. अर्जदार क्र.१ व २ यांना पालनपोषनाकरीता पैशांची त्यांना गरज आहे. त्यामुळे त्यांना अंतरीम पोटगी देणे न्यायोचित आहे. सामनेवाला क्र.१ चे उत्पन्न व कामधंदा पाहता

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Judgement
SMITA MANOHAR BANSOD
2023.03.16
17:59:24 +0530

अर्जदारांना एकत्रितरित्या एकुण ३,५००/— रूपये अंतरीम पोटगी देणे योग्य राहिल. सबब, मुद्‌दे क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो. परिणामत: खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

**अ.** अर्जदारांची अंतरीम अन्नवस्त्र रक्कम मिळण्याची मागणी मंजुर करण्यात येते.

**ब.** सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ व २ यांना एकत्रितरित्या एकुण ३,५००/— (रूपय तीन हजार पाचशे हजार मात्र) दरमहा अन्नवस्त्र व उदरनिर्वाह करीता अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारीख दिनांक १८/०७/२०२२ पासुन मुख्य अर्ज निकाली निघे पर्यंत द्यावे.

**क.** या अर्जाचे आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना विनामुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Judgement
SMITA
MANOHAR
BANSOD
2023.03.16
17:59:30 +0530

**( स्मिता एम. बन्सोड )**

ठिकाण : कोपरगांव. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. १),
दिनांक : १६/०३/२०२३. कोपरगांव, जि. अहमदनगर.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, या पी. डी. एफ. न्यायनिर्णय/आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णय/आदेश यातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | डी. ए. टेमकर. |
| न्यायालयाचे नाव | :– | श्रीमती स्मिता एम. बन्सोड,<br>सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोपरगांव, जि. अहमदनगर. |
| दिनांक | :– | १६/०३/२०२३. |

पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्णय/आदेश यावर सही केलेली दिनांक १६/०३/२०२३ रोजी न्यायनिर्णय/आदेश अपलोड करण्यात आल्याची दिनांक १६/०३/२०२३.